# प्राणीसंग्रहालयात गमड्रॉप





"आजोबा, चला!" डॅन म्हणाला.
"आपण प्राणीसंग्रहालय बघायला जाऊ!"
"चला!" आजोबा लगेच तयार झाले.
"आपली गाडी 'गमड्रॉप' घेऊन जाईल आपल्याला."
'गमड्रॉप' म्हणजे आजोबांची जुनी विंटेज गाडी.
डॅनला गमड्रॉप मध्ये बसून फिरायला फार
आवडत असे.





आजोबा, डॅन आणि गमड्रॉप प्राणीसंग्रहालयात गेले. त्यांनी आधी पक्षी पाहिले. "मला रोहित सर्वात जास्त आवडले!" डॅन म्हणाला. "मला पेलिकन!" आजोबा म्हणाले. आजोबांनी गमड्रॉप पक्षांजवळ उभी केली.





आजोबा आणि डॅन पुढे चालू लागले. थोड्याच वेळात त्यांना एक उंट दिसला. उंटानी विचित्र आवाज काढले. उंटाचं काहीतरी बिनसल्यासारखं वाटत होतं. "आवाजावरून हा उंट आजारी वाटतो आहे," आजोबा म्हणाले. "आजोबा, तो तर आजारी दिसतो सुद्धा आहे!" डॅन म्हणाला.







दोघे अजून थोडे पुढे चालत गेले. पुढे त्यांना एक हत्ती दिसला. सोंड हवेत उंचावून हत्ती मोठ्याने चित्कारला. "याचा आवाज तर गमड्रॉपच्या हॉर्न सारखा आहे!" आजोबांना हसू आलं.

"तो नमस्ते म्हणतोय आजोबा." डॅन म्हणाला.

"चल आपण गमड्रॉपकडे परत जाऊ," आजोबा म्हणाले. "मी आता थोडा दमलो आहे".



आजोबा आणि डॅन चालत चालत गमड्रॉप पाशी परतले. बघतात तर काय! गमड्रॉपवर पक्षीच पक्षी बसलेले! रोहित, करकोचे आणि पेलिकन टपावर बसले होते. मागच्या सीटवर एक छोटं तपकिरी बदक, आणि अजून एक पक्षी मागे बंपरवर बसलेला! "या पक्षांना चक्कर मारून आणू चला." डॅनला कल्पना सुचली.







मग गमड्रॉपने सगळ्या पक्षांना प्राणीसंग्रहालयाची सैर करवली. त्यांना पाहून लोक आश्चर्यचकित झाले. लोकच नाही तर इतर प्राणीसुद्धा चकित झाले! पक्षांना सैर करवणारी विंटेज गाडी क्वचितच कुठल्या प्राणीसंग्रहालयात पाहायला मिळत असावी!





जिराफाच्या पिंजऱ्याजवळून जाताना त्यांना एक पाटी दिसली




पाटी शेजारी एक माणूस उभा होता. त्याच्या मागे सहा मुले होती. खूप उदास दिसत होती. तेवढ्यात त्या माणसाला गमड्रॉप दिसली. तो गमड्रॉपवरच्या पक्षांकडे पाहताच राहिला!.







""अहो!" त्याने हाक दिली. "थांबा थांबा!" तो धावत गमड्रॉप जवळ आला. त्याला पाहून सगळे पक्षी उडून गेले.

"क्षमा करा साहेब," तो आजोबांना म्हणाला. "मी प्राणीसंग्रहालयाचा मॅनेजर आहे. आमचा उंट आज आजारी पडला आहे, त्यामुळे मुलांना उंटावर बसून फेरी मारता येत नाही आहे. तुम्ही कृपया तुमच्या या भारी गाडीतून मुलांना फेरी मारून आणाल का?"

"अवश्य!" आजोबा प्रसन्नपणे हसून म्हणाले.



प्राणीसंग्रहालयाच्या मॅनेजरने मग ती पाटीच बदलून टाकली. आता त्यावर लिहिले होते:




""चढा पटकन!" आजोबा म्हणाले.

"हुर्रे!" मुले आनंदात ओरडली, आणि पटापट गाडीत चढली.







गमड्रॉप मुलांना घेऊन प्राणीसंग्रहालयात सगळीकडे फिरली. गाडी हत्तीजवळून जात असताना हत्ती सोंड उंचावून चित्कारला. "पों!पों!" गमड्रॉपने हॉर्न वाजवून त्याला उत्तर दिलं.



गमड्रॉप वाघाच्या पिंजऱ्याजवळ जाऊन थांबली. मुले खाली उतरून खेळायला निघून गेली. मॅनेजर, आजोबा आणि डॅनच्या जवळ आले. "धन्यवाद! तुमची खूप मदत झाली!" ते म्हणाले. "ही छोटीशी भेट तुमच्यासाठी - प्राणीसंग्रहालयाचा विनामूल्य पास!" डॅन आणि आजोबांनी मॅनेजरचे आभार मानले. प्राणीसंग्रहालय सोडून जाताना डॅनला फार वाईट वाटत होते.





आजोबा आणि डॅन गमड्रॉपला घेऊन घरी आले. "ओह!" डॅन उद्गारला. "हे बघा मला काय सापडलं! बदकाचं अंडं आहे आजोबा! गमड्रॉपच्या मागच्या सीटवर होतं. अजून गरम आहे!"

डॅन हसला. "हे बदकाला लगेच परत दिलं पाहिजे. आत्ता ताबडतोब प्राणीसंग्रहालयात परत जायला हवं!"

आजोबा दमले होते, पण ते हसले. "चालेल! चल डॅन, चढ पटकन" ते म्हणाले. "लगेच निघूया आणि आपला फ्री पास वापरूया!"



समाप्त